**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रेसनोट**

- **मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते दिनांक ०५ सप्टेंबर २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व शाळेतील सी.सी.टीव्हींसाठीचे "मध्यवर्ती शाळा नियंत्रण कक्ष" या कामाचा ऑनलाईन लोकार्पण सोहळा संपन्न**

मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते दिनांक ०५ सप्टेंबर २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व शाळेतील सी.सी.टीव्हींसाठीचे "मध्यवर्ती शाळा नियंत्रण कक्ष" या कामाचे ऑनलाईन लोकार्पण सोहळा संपन्न झाला. मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील विद्यार्थ्यांच्या शिक्षण आणि सुरक्षेचा विषय कायम संवेदनशीलपणे हाताळत आली आहे. मिरा भाईंदर शहरातील मनपा शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी 36 शाळांमध्ये आधीपासून कार्यान्वित असलेले 200 सी.सी.टी.व्ही. कॅमेरे एकाच ठिकाणी केंद्रित करून त्यावर देखरेख आणि नियंत्रण ठेवण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली तयार केलेल्या अद्यावत अश्या मध्यवर्ती शाळा नियंत्रण कक्षाचे लोकार्पण मा. मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते पार पडले. सदर उपक्रम राबविणारी मिरा भाईंदर महानगरपालिका ही राज्यातील पहिली महापालिका ठरली आहे. इतर महापालिकांनी सुद्धा मिरा भाईंदर महानगरपालिकेचा आदर्श घेऊन सदर उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेसाठी सक्षम रहावे असे मनोगत मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे, मुख्यमंत्री यांनी व्यक्त केले व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्तुत्य उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

अत्याधुनिक सर्व्हर आणि विशेष कार्यप्रणालीयुक्त असा यु.पी.एस. जनरेटर बॅकअप असलेल्या नियंत्रण कक्षात एकाच वेळी साधारण एक हजार सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांवर नजर ठेवणारी अद्यावत यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. या कक्षात संगणक, व्हिडिओ वॉल, सभाकक्ष, एक बॅकअप सर्व्हर, देखरेख ठेवण्यासाठी असलेले अधिकारी व कर्मचारी आणि प्रशस्त वातानुकूलित जागा असलेल्या या कक्षात सद्यस्थितीत मनपा शाळा यांच्यावर लक्ष केंद्रित केले असून भविष्यात मिरा भाईंदर शहरातील सर्व खाजगी शाळेतील सी.सी.टी.व्ही. कॅमेरे सुद्धा या उपक्रमात समाविष्ट करण्यात येतील. या नियंत्रण कक्षात कार्यरत असलेले पथक मनपा शाळेतील सीसीटीव्ही फुटेज सकाळी सात ते संध्याकाळी पाच वाजेपर्यंत तपासण्याचे व त्याचे जतन करण्याचे काम करतील. मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी उचललेल्या या महत्त्वपूर्ण पावलामुळे भविष्यात घडणाऱ्या अनुचित घटनांवर कायमस्वरूपी आळा बसुन हा विषय अतिशय संवेदनशीलपणे हाताळण्यात नक्कीच मदत होणार आहे. मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या निर्देशानुसार व मा. आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कक्ष सुरू झाला असून या कक्षाद्वारे विद्यार्थांच्या विशेषतः विद्यार्थिनींच्या सुरक्षितेचा प्रश्न अतिशय संवेदनशीलपणे हाताळण्यासाठी उचलले गेलेले हे महत्त्वाचे पाऊल आहे. सदर कार्यक्रमास मा. आमदार श्री. प्रताप सरनाईक, मधुकर पांडे पोलीस आयुक्त, मिरा भाईंदर वसई विरार शहर, अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, शहर अभियंता दिपक खांबित, उपायुक्त कल्पिता पिंपळे, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त (मुख्यालय) संजय दोंदे, महापालिका अधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते.